क्र. निशि/मागणी/२०१९/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ५४१

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
E mail : dycor.ho-mum@gov.in

दिनांक - २४/०९/२०१९

प्रति,

१. उप नियंत्रक शिधावाटप,
अ,ड, ई, ग व फ परिमंडळ

२. उप संचालक (गो/वा),
सं.ना.पु. परेल.

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे नियमित मासिक नियतन (सुधारीत) माहे ऑक्टोबर, २०१९**

**संदर्भ :-** १.शासनपत्र क्र. अधापु-२०१९/प्र.क्र.८/ना.पु.-२२, दि. १९ ऑगस्ट, २०१९
२.क्र. निशि/मागणी/२०१९/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.४८८, दि. ३०.०८.२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे ऑक्टोबर, २०१९ करीता परिमंडळनिहाय नियतन मंजूर करण्यात आले आहे.

ज्या कार्डधारकास e-PoS द्वारे जुलै, २०१९ मध्ये धान्य वितरीत करण्यात आले आहे त्यांना गरजेनुसार १००% + १०% नियतन व e-PoS मशिनचा वापर न करता किंवा रुट नॉमिनीचा वापर न करता जुलै, २०१९ मध्ये मॅन्युअली धान्य वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यास गरजेनुसार १००% नियतन व माहे जुलै, २०१९ अखेर शिल्लक साठा विचारात घेऊन सदरचे ऑक्टोबर, २०१९ करिता नियतन मंजूर करण्यात आले आहे.

ई, ग, व फ परिमंडळ कार्यालयांकडून माहे सप्टेंबर, २०१९ च्या नियतनामधून माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये विक्री केलेल्या साठ्याची दुकाननिहाय माहिती प्राप्त झाली असून सदर साठा पुढील महिन्यांत वितरणासाठी कमी पडणार असल्याने वाढीव नियतन मंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच, हमीपत्र भरुन घेतल्यानुसार वाढीव लाभार्थ्यांसाठी धान्य कमी पडत असल्याने कोटा वाढवून मिळण्याबाबतचे प्रस्ताव अ, ड, ई व ग परिमंडळ कार्यालयांकडून प्राप्त झाले आहेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे पात्र लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहू नयेत म्हणून माहे ऑक्टोबर, २०१९ करिता खालीलप्रमाणे सुधारीत नियतन मंजूर करण्यात येत आहे.

**माहे ऑक्टोबर, २०१९ करीता प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत सुधारीत मंजूर नियतन**

(आकडे मे. टन मध्ये)

| अ. क्र. | परि मंडळ | दिनांक ३०.०८.२०१९ च्या पत्रान्वये मंजूर नियतन | | नियतनात वाढ | | माहे ऑक्टोबर, २०१९ करिता सुधारीत मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| | | | | | | | |
| १ | अ | १११८.४१४ | १६७०.७२२ | ६३.५५९ | ७८.४५१ | ११८१.९७३ | १७४९.१७३ |
| २ | ड | १६०२.८२१ | २३९१.५२५ | ४३.९२९ | ६६.०९३ | १६४६.७५० | २४५७.६१८ |
| ३ | ई | ३७४१.५८१ | ५६३४.५१० | २३९.५४४ | ७५७.९१२ | ३९८१.१२५ | ६३९२.४२२ |
| ४ | ग | १९८५.८४१ | २९६१.९४१ | १५८.१७७ | २२९.५८१ | २१४४.०१८ | ३१९१.५२२ |
| ५ | फ | ४९५३.९५१ | ७३९७.४७२ | १७९.६११ | २५४.१८० | ५१३३.५६२ | ७६५१.६५२ |
| एकूण | | १३४०२.६०८ | २००५६.१७० | ६८४.८२० | १३८६.२१७ | १४०८७.४२८ | २१४४२.३८७ |

वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या वाढीव नियतनानुसार तात्काळ वितरण आदेश निर्गमित करुन अन्नधान्याची संपूर्ण उचल करण्यात यावी. तसेच, वाढीव नियतनाचे वाटप पात्र लाभार्थ्यांना होईल याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी. संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना कायम रहातील. सदर वाटप e-POS मशिनद्वारे ऑनलाईन पध्दतीने १००% करणे बंधनकारक राहिल.

(कैलास पगारे) भा.प्र.से.
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत :

१. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २२, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय, जी. टी. हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई.